स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन
सहकार आयुक्त व निबंधक
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
नवीन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, पुणे-४११ ००१

दुरध्वनी क्रमांक- २६१२९३२१/२६१२२८४६ ई-: मेल- commpat2018@gmail.com

जा.क्र.पतसंस्था/सआ/एनपीए कालावधी/सन २०२३ / २७६५ दि.३१/०३/२०२३

## परिपत्रक

**विषय : बिगर कृषी सहकारी पतसंस्थांच्या अनुत्पादक जिंदगी (एनपीए) वर्गीकरणाच्या कालावधीबाबत.**

**संदर्भ :** १) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील दि.१०/११/२००४,दि.२१/१२/२००४,दि.५/२/२०११ व दि.२३/१/२०१७ रोजीची परिपत्रके
२) महाराष्ट्र राज्य बिगर कृषी सहकारी पतसंस्था नियामक मंडळ, पुणे यांचेकडील दि.१७/३/२०२२ चे परिपत्रक

राज्यातील बिगर कृषी सहकारी पतसंस्थांना या कार्यालयाकडील दि.१०/११/२००४ चे परिपत्रकानुसार, अनुत्पादक जिंदगी (एनपीए) चे निकष लागू करण्यात आलेले आहेत. त्यानुसार उत्पन्न निश्चितीचे धोरण, अनुत्पादक जिंदगी वर्गीकरण व तरतुदी याबाबतचे निकष निश्चित करण्यात आलेले आहेत.

एखाद्या कर्जखात्यावरील कर्जाचा हप्ता, व्याजाचा हप्ता किंवा कर्ज व व्याजाचा हप्ता हा ठरवून दिलेल्या कालावधीनंतरही वसूल न झाल्यास असे खाते अनुत्पादक जिंदगी (एनपीए) होते. सदरचे एन.पी.ए. निकष केवळ कर्जासाठीच लागू नसून सर्व प्रकारच्या अनुत्पादक जिंदगीसाठी लागू आहेत.

या कार्यालयाकडील दि.१०/११/२००४ चे परिपत्रकानुसार, अनुत्पादक जिंदगीच्या वर्गीकरणाबाबत लागू करण्यात आलेली तरतुदीची टक्केवारी विषद केलेली असून दि.५/२/२०११ च्या परिपत्रकानुसार पतसंस्थांसाठी अनुत्पादक जिंदगी ठरविण्याचा थकीत कालावधी सहा महिन्यांचा करण्यात आला आहे.

या कार्यालयाकडील दि.१७/३/२०२२ चे परिपत्रकानुसार, कोविड-१९ च्या उद्भवलेल्या पार्श्वभूमीवर, राज्यातील बिगर कृषी सहकारी पतसंस्थांच्या कर्ज वसुलीवर होणारा परिणाम विचारात घेऊन सन २०२१-२२ या आर्थिक वर्षासाठी, अनुत्पादक जिंदगीच्या निकषात बदल करुन अनुत्पादक जिंदगी ठरविण्याचा प्रचलित असलेल्या सहा महिन्याच्या कालावधी ऐवजी नऊ महिने करण्यात आलेला होता.

याबाबत राज्यातील बिगर कृषी सहकारी पतसंस्थांनी सन २०२२-२३ या व त्यापुढील आर्थिक वर्षाकरिता उत्पादक जिंदगी (Standard Assets) चे अनुत्पादक जिंदगी (Non Performing Assets) मध्ये वर्गीकरण करण्यासाठी कर्जाचा थकीत कालावधी सहा महिन्याचा निश्चित करण्यात येत आहे. त्यापुढील एन.पी.ए. वर्गीकरणाचा कालावधी या कार्यालयाकडील दि.१०/११/२००४ च्या परिपत्रकानुसार कायम राहील.

(अनिल कवडे)
**सहकार आयुक्त व निबंधक,**
**सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे**

प्रति,

१. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (प्रशासन/लेखापरीक्षण) (सर्व)
२. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
३. जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग १, सहकारी संस्था (सर्व)

४. अध्यक्ष, नागरी/ग्रामीण/बिगर कृषी/पगारदार सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्या. (सर्व) (राज्य/ विभाग/ जिल्हा/ तालुका)

५. अध्यक्ष/व्यवस्थापक, ----------------- नागरी/ग्रामीण बिगरशेती/ पगारदार कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या.---------- ता.------- जि.-----------(सर्व)

प्रत माहितीस्तव :

१. मा.अपर मुख्य सचिव (सहकार व पणन), सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२ (सविनय सादर)

२. अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

३. अपर निबंधक, सहकारी संस्था (पतसंस्था/लेखापरीक्षण), मुख्यालय, पुणे

४. कार्यासन अधिकारी (माहिती व तंत्रज्ञान), मुख्यालय, पुणे - यांना संकेतस्थळावर त्वरीत प्रसिद्धीस्तव

५. धारिका संग्रही